**गैरअर्जदार क्रमांक ०१ व त्यांचे अधिवक्ता यांचा पुकारा केला असता गैरहजर. करिता उलटतपास नाही.**

**गैरअर्जदार क्रमांक २ विरुध्द प्रकरणात एकतर्फा अदेश परीत झाला असल्याने उलट तपास नाही.**

**शपथेवर उलटतपास ॲड. श्री ठाकुर गैरअर्जदार क्रमांक ०३ तर्फे :—**

१४. मयत मंगेश हा माझा मुलगा होता त्याचे लग्न झाले नव्हते. अपघाताचे वेळी मंगेश हा गैरअर्जदार क्रमांक १ चे कंपनीचे क्वार्टरमध्ये राहात होता. माझा मुलगा मंगेश हा अंदाजे २—३ वर्षापासून गैरअर्जदार क्रमांक १ कडे कामाला होता. गैरअर्जदार क्रमांक १ कंपनी माझा मुलगा मंगेश यास रोखीने तसेच बॅक खात्यात पैसे देत होते. हे म्हणने खरे आहे की गैरअर्जदार क्रमांक १ कंपनी जे काही रोखीने पेमेंट माझे मुलाला देत होते त्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. हे म्हणने खरे नाही की माझा मुलगा मंगेश गैरअर्जदार क्रमांक १ कंपनीमध्ये रोजंदारीने कामावर होता. साक्षदार स्वत: सांगतो की तो महीनेवारीने कामावर होता. हे म्हणने खरे नाही की माझा मुलगा मंगेश महीनेवारीने कामावर होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की माझे मुलाला मे २०१७ मध्ये ४०००/— रुपये पगार मीळाला होता. हे म्हणने खरे नाही की मे २०१७ नंतर माझा मुलगा गैरअर्जदार क्रमांक १ कडे कामाला नव्हता. हे म्हणने खरे आहे की गैरअर्जदार क्रमांक १ कंपनीचा मुख्य

अधिकारी देशमुख नावाचा व्यक्ती आहे. हे म्हणने खरे आहे की मी गैरअर्जदार क्रमांक २ पुष्पा चौधरी हीस ओळखत नाही. हे म्हणने खरे नाही की ज्या ट्रॅक्टर व ट्रॉली ने अपघात झाला तो गैरअर्जदार क्रमांक १ चे मालकीचा नाही. गैरअर्जदार क्रमांक १ व २ चा काय संबंध आहे हे मला माहीती नाही.

१५. गैरअर्जदार क्रमांक २ व ३ ला मी वकीलामार्फत नोटीस पाठवीला होता. सदर नोटीसेसची प्रत मी रेकॉर्डवर दाखल केली नाही. हे म्हणने खरे आहे की माझा मुलगा गैरअर्जदार क्रमांक १ कडे काम करीत असल्याने त्याचा गैरअर्जदार क्रमांक २ शी कोणताही संबंध नव्हता. हे म्हणने खरे नाही की मी गैरअर्जदार क्रमांक २ व ३ विरुध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणने खरे आहे की माझा मुलगा गैरअर्जदार क्रमांक १ कंपनी कडे काम करीत होता व तो गैरअर्जदार क्रमांक २ कडे कामाला नव्हता. हे म्हणने खरे नाही की मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केली असून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण झाला.

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. २२.०१.२०२६.